## प्रेस नोट दि. २६/०८/२०१९
## भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे शहर

### लहान मुलास नातेवाईकांचा शोध घेवुन त्यास त्यांचे ताब्यात देवुन उल्लेखनिय कामगीरी केलेबाबत.,

दि. २५/०८/२०१९ रोजी सायंकाळी १८.०० वाजणेच्या सुमारास पोउनि समाधान मचाले, पोना ६६४० ललित मोहिते, पोशि मनोज बडदे, पोशि १००४८ काटे हे कात्रज हद्दीत पेट्रोलींग करत असताना, कात्रज-कोंढवा रोडवर ब्रिजखाली लहान मुलगा आढळुन आला. त्याचेकडे अधिक चौकशी केली असता, तो घाबरलेला असल्याने त्याने कोणत्याही स्वरुपाची माहिती दिली नाही यास्तव त्याचेबाबत इतरत्र चौकशी करता, काहीएक माहिती मिळुन आली नाही. त्यास अधिक चौकशीकरीता कात्रज पोलीस चौकीस घेऊन जाऊन त्यास विश्वासात घेऊन अधिक चौकशी करता त्यांने तो आंबेगांव पठार हद्दीत रहात असल्याचे सांगितले

आंबेगांव पठार पोलीस चौकीचे पोउनि विक्रांत डिगे यांना त्याबाबत संपर्क साधुन सदरच्या मुलांबाबत माहिती दिली असता, त्यांनी सदर मुलाचे नांव कु. आकाश राजु रासकर, वय-१३ वर्ष, रा. रवी टेरेस सोसायटी, डी-१२, चंद्रभागा चौक, आंबेगांव बुद्रुक, पुणे असे असल्याचे सांगितले. सदरचा मुलगा दि. २४/०८/२०१९ रोजी सरस्वती विद्यामंदीर, दत्तनगर येथील शाळेत जातो असे सांगुन तो सायंकाळी दहिहंडी बघण्याकरीता गेला असता, तो परत आला नसल्याने त्यांचे आजी सौ. शशिकला सुधाकर जगतात, वय-६३ वर्षे यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणेस गुन्हा रजिस्टर नं. ५७९/२०१९ भादंवि कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असल्याचा सांगितले.

पोउनि विक्रात डिगे त्यांनी तात्काळ फिर्यादी नामे सौ. शशिकला सुधाकर जगतात, वय-६३ वर्षे यांना बोलावुन त्यांचे समक्ष पोउनि विक्रांत डिगे यांनी मुलगा कु. आकाश राजु रासकर यास सुखरुपपणे ताब्यात दिले.

सदर हरविलेला मुलगा कु. आकाश राजु रासकर यास परत मिळवुन दिल्या बद्दल तिची आजी सौ. शशिकला सुधाकर जगतात यांनी कृतज्ञता व्यक्त करून पोलीस दलाचे आभार मानले.

